सायंदैनिक
# गुड इव्हिनिंग City
goodeveningcity@gmail.com
www.goodeveningcity.com

२५ ऑक्टोबर २०२६, रविवार | वर्ष १५ वे | अंक १७६ | पृष्ठे ६

**योजनेमध्ये मोफत उपचार व शस्त्रक्रिया**
**बुलडाणा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल**
क्रिटीकल केअर व ट्रॉमा सेंटर
पत्ता :- आरास ले आऊट, जांभरूण रोड, बुलडाणा (24 तास सेवा उपलब्ध)
मो. 7575919191, 7575929292, 7575939393, 9096354891
(MJPJAY) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, (PMJAY) प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना संलग्नित
**संपुर्ण गटातील कुटूंबासाठी संपूर्ण प्रकाराच्या आजारांवरती मोफत व गुणवत्तापुर्ण उपचार व शस्त्रक्रिया इ.**
खालील आजारावरील सुविधा संपूर्ण मोफत
1) नवजात बाळाचे आजार (NICU)
2) लहान मुलांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (PICU)
3) मोठ्या मानसांचे संपूर्ण आजार व शस्त्रक्रिया (मेडिसिन ICU)
4) श्वासाचे आजार / मेंदुचे आजार व शस्त्रक्रिया.
5) किडनिचे आजार व मुतखड्याची शस्त्रक्रिया.
6) पोटाचे आजार व शस्त्रक्रिया तसेच दुर्बिनद्वारे शस्त्रक्रिया (Laproscopy)
7) अस्थिरोग विभाग व शस्त्रक्रिया
8) ट्रॉमा व एक्सीडेंट सर्जरी व उपचार
9) स्त्रिरोग व प्रसुतीरोग उपचार व शस्त्रक्रिया.
10) कान, नाक, घसा उपचार व शस्त्रक्रीया.
11) दंतरोगाची सर्जरी व उपचार
12) कॅन्सर उपचार, शस्त्रक्रिया इत्यादीची सुविधा
योजनेसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे - आयुष्यमान कार्ड
टिप - बुलडाणा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल मध्ये आयुष्यमान कार्ड काढून मिळेल

# काँग्रेसच्या देशव्यापी 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियानास सुरुवात

## भाजप सरकारकडून वारंवार देशातील लोकशाहीची हत्या : अरुण यादव

**१ नोव्हेंबरला दिल्लीत महारॅली**

**बुलढाणा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेला मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. नागरिकांना आपल्या पसंतीच्या उमेदवाराची निवड मुक्तपणे आणि निर्भयपणे करता यावी, यासाठी निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष असणे आवश्यक आहे. मात्र देशात विधानसभा, लोकसभा असो वा अन्य निवडणुका.. या अधिकाराला लुटण्याचे आणि चोऱ्या करण्याचे काम भाजप सरकारांकडून केले जात आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, पश्चिम बंगाल आणि बिहार यांसारख्या अनेक राज्यांमध्ये निवडणुकांदरम्यान व्यापक प्रमाणात मताची चोरी करून सरकारे बनवली गेली. देशातील लोकशाहीची वारंवार हत्या देश आणि प्रदेशात बसलेल्या भाजप सरकारांकडून केली जात असल्याचा घणाघात माजी केंद्रीय मंत्री तथा वोट बचाओ, देश बचाओ अभियानाचे निरिक्षक अरुण यादव यांनी केला. तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी राष्ट्रपतींकडे करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

काँग्रेस पक्षाच्या वतीने देशभरात 'वोट बचाओ, देश बचाओ' या देशव्यापी अभियानास सुरुवात झाली असून या अभियानांतर्गत बुलढाण्यात रविवार २५ ऑक्टोबर रोजी हॉटेल रामा ग्रँड येथे पत्रकार परिषद पार पडली. यावेळी अरुण यादव बोलत होते. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश पाटील, माजी आमदार तथा लोकनेते राहुल बोंद्रे, आमदार धिरज लिंगाडे, माजी आमदार राजेश एकडे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, प्रदेश सरचिटणीस शाम उमाळकर, प्रदेश सचिव रामविजय बुरुंगले, प्रदेश सचिव डॉ. अरविंद कोलते तसेच प्रदेश व जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी आणि सहकारी मोठ्या संख्येने उप-स्थित होते. पुढे बोलताना अरुण यादव म्हणाले की, काँग्रेस नेते राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली 'वोट बचाओ, देश बचाओ'चा लढा लढल्या जात आहे. या अभियानांतर्गत १ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या सहभागातून महारॅली आयोजित करण्यात आली आहे. या रॅलीच्या माध्यमातून मतदानाचा अधिकार, मतदार यादीची पारदर्शकता आणि लोकशाही संस्थांची विश्वासार्हता हे मुद्दे राष्ट्रीय स्तरावर मांडले जाणार आहेत. २५ ऑक्टोबर ते २६ नोव्हेंबर या कालावधीत हे अभियान जिल्हा, ब्लॉक, मंडल आणि बूथ स्तरापर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. गावोगावी जाऊन मतदार यादीची छाननी करणे, मतदारांच्या नोंदींबाबत जागृती निर्माण करणे, पात्र मतदारांची नावे यादीत आहेत की नाही याची पडताळणी करणे आणि संभाव्य त्रुटींबाबत संबंधित यंत्रणांकडे दाद मागण्यासाठी नागरिकांना मार्गदर्शन करणे, यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.



### लोकशाहीच्या रक्षणासाठी दुसरा स्वातंत्र्यसंग्राम लढावा लागेल : सपकाळ

लोकशाहीचा आत्मा असलेल्या मतदानाच्या अधिकारावरच घाला घातला जात असेल, तर केवळ निषेध करून चालणार नाही. लोकशाहीच्या रक्षणासाठी दुसरा स्वातंत्र्यसंग्राम लढावा लागेल, असा आक्रमक निर्धार काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला. निवडक लोकांनी निवडक लोकांसाठी चालविलेला कारभार म्हणजे लोकशाही नव्हे. लोकशाही ही सर्वसामान्य जनतेची, जनतेसाठी आणि जनतेकडून चालणारी व्यवस्था आहे. मात्र, मतचोरीच्या आरोपांमुळे या व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याची टीका त्यांनी पत्रकार परिषदेत केली. महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा आणि मतदारसंख्येचा संदर्भ देत हर्षवर्धन सपकाळ यांनी मतदार नोंदणीच्या प्रक्रियेवरही प्रश्न उप-स्थित केला. राज्याची लोकसंख्या सुमारे १४ कोटी असताना मतदारांची अपेक्षित संख्या आणि प्रत्यक्ष नोंदणीकृत मतदार यामध्ये मोठी तफावत आढळून येते. महाराष्ट्रात १० कोटी मतदार अपेक्षित असताना प्रत्यक्ष संख्या ७ कोटींच्या आसपास राहिली, तर उर्वरित तीन कोटी मतदार कुठे गेले, याचे उत्तर कोण देणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# शिंदेंनी उठाव केला नसता, तर भाजपला सत्तेबाहेर बसावे लागले असते!

## गायकवाड यांचा दावा; जरांगे यांच्याशी दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्नाचा आरोप

**बुलढाणा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्यात दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी केला आहे. भाजपचे आमदार आणि कार्यकर्ते बोलत असल्याचे दिसणाऱ्या एका ध्वनिचित्रफितीचा संदर्भ देत त्यांनी हा आरोप केला. तसेच, एकनाथ शिंदे यांनी उठाव केला नसता, तर भाजपचे १०६ आमदार असूनही पक्षाला सत्तेबाहेर बसावे लागले असते, असा टोला त्यांनी भाजपला लगावला. महाराष्ट्रात २३६ जागांवर मिळालेल्या यशामागे एकनाथ शिंदे यांचा चेहरा पुढे केल्याची भूमिका त्यांनी मांडली. संबंधित ध्वनिचित्रफितीचा संपूर्ण संदर्भ आणि त्यातील वक्तव्यांची स्वतंत्र पुष्टी अद्याप स्पष्ट झालेली नाही. प्रवीण दरेकर यांच्या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर गायकवाड यांच्या आरोपांमुळे महायुतीतील राजकीय श्रेयावरून पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. या आरोपांवर भाजपकडून काय प्रतिक्रिया येते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



### '२३६ जागांच्या यशात शिंदेंचा चेहरा महत्त्वाचा'

महाराष्ट्रातील निवडणुकीतील यशाचा उल्लेख करताना गायकवाड यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाला श्रेय दिले. ज्या २३६ जागा आल्या, त्याही एकनाथ शिंदे साहेबांचा चेहरा महाराष्ट्रासमोर तुम्ही केला म्हणून आल्या, असे ते म्हणाले. शिंदे यांचा चेहरा पुढे केल्यामुळे महायुतीला निवडणुकीत फायदा झाल्याचा दावा त्यांनी केला. भाजप आणि शिवसेनेतील राजकीय श्रेयावरून सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर गायकवाड यांचे हे विधान महत्त्वाचे मानले जात आहे. शिंदे यांच्या नेतृत्वाची भूमिका आणि महायुतीच्या निवडणुकीतील यश यांचा परस्पर संबंध असल्याचे त्यांनी आपल्या वक्तव्यातून मांडले.



# 'मित्रांगण'च्या अंगणी बहरली 'चांदण्यातील गझल' !

## डॉ. राजेश उमाळे यांची स्वरभरारी.. नितीन भट यांची शब्दसरी.. बुलढाण्यात झाली साजरी, मराठी गझलांची कोजागिरी !!







सर्व फोटो सौजन्य : रविकिरण टाकळकर

**बुलढाणा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** ***कोजागिरी पौर्णिमेची पूर्वसंध्या.. आणि या पूर्वसंध्येला उगविलेल्या पूर्ण चंद्रामध्ये काल बुलढाण्यात 'चांदण्यातील गझल' बहरली.. मराठी गझलेवर प्रेम करणाऱ्या मित्रांगण परिवाराने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी 'मराठी गझलांची कोजागिरी साजरी केली. गझलरत्न डॉ. राजेश उमाळे यांचे गायन आणि गझलकार नितीन भट यांचे निवेदन या 'चांदण्यातील गझल' कार्यक्रमाला रंगवून गेले. एडेड हायस्कूलच्या आतील प्रांगणात, शेकडो रसिकांच्या गर्दीत, मान्यवरांच्या उपस्थितीत सादर झालेल्या मराठी-हिंदी गझलांनी अविस्मरणीय सांगितीक मेजवानी दिली.***

बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, बुलढाणा एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त डॉ. प्रमोद देशपांडे, एआरडी परिवाराचे राजेश देशलहरा, अंतरराष्ट्रीय शायर डॉ. गणेश गायकवाड यांच्या हस्ते दीपप्रज्वलन होवून गझल कार्यक्रमाला प्रारंभ झाला. तत्पूर्वी माँ जिजाऊ अर्बनचे उपाध्यक्ष शिवाजीराव तायडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हातेडी येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील सुडी कुणीतरी अज्ञाताने जाळली होती. त्यानंतर खचलेल्या या शेतकऱ्याला पुन्हा उठून उभे करण्यासाठी श्री तायडे यांनी भरीव आर्थिक मदत दिली. त्याबद्दल मित्रांगणने शिवाजीराव तायडे यांचा सन्मान केला. याव्यतिरीक्त डॉ. प्रमोद देशपांडे, ॲड. रामानंद कविमंडन, डॉ. दुर्गासिंग जाधव, सतिष कोठारी, संतोष मालू, परेश विसपुते, डॉ. विरेंद्र काटकर, जितू अक्कर यांचा कार्यक्रमासाठी विशेष योगदानाबद्दल स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. नंतर डॉ. राजेश उमाळे यांनी डॉ. शेख यांच्या 'सदाचार संकल्प' या प्रार्थनेने गझलेच्या प्रवासाला सुरुवात केली. दूसरीच गझल दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांना समर्पीत होती. 'सुटला अजून कोठे मातीस या सुवास, मेघा लगेच का रे परतीचा प्रवास ! गेलाय प्राण त्याचा मागीत पाणी पाणी, आता तरी अखेरी भिजवून जा शवास ।।. आपल्या सुमधूर स्वरांनी डॉ. उमाळे रसिकांना जिंकत गेले. नितीन भट यांचे निवेदन गझलेला शब्दश्रृंगार चढवित होते. गौरव आठवले यांची गझल वेगळाच भाव सांगणारी ठरली.

*'आयुष्यातून उठलो होतो, पण दूनियेला पटलो होतो,*
*जीव घ्यायला तेच निघाले, ज्यांच्यासाठी झटलो होतो',*

ईलाही जमादार यांच्या हिंदी गझलेला मिळालेल्या प्रतिसादात चांदण्याची गझल न्हावून निघाली. 'एक होकार दे, फार काही नको, फार काही नको, फक्त नाही नको ।।', ही तरूण मनाचा ठाव घेणारी वैभव जोशींची गझल दाद मिळविणारी होती. नितीन भट यांनी स्वतः रचलेले 'श्वास हा रेशमी' हे गीत जेव्हा सादर झाले तेव्हा टाळ्यांचा झालेला लक्षणीय कडकडाट डॉ. उमाळे यांच्या जादूई स्वरांच्या परिचयासाठी पुरेसा होता. 'केले हजार वादे, अन् पक्षपात केला, माझ्याच माणसांनी माझाच घात केला', या नितीन देशमुख यांच्या गझलेला रसिकांची भरभरून वाहवा मिळाली.

गझलेच्या मध्ये मध्ये हजेरी लावणारे शेर गझलेचे आकाश उजळवून टाकणाऱ्या आतिषबाजीप्रमाणे होते.

***'शिकता शिकता शिकतो आपण, तेव्हा कोठे टिकतो आपण । छोट्या छोट्या स्वार्थासाठी, माणूसकीला विकतो आपण ।।'.***

इतरही काही गझल डॉ. उमाळे यांनी आपल्या खास शैलीत सादर करून रसिकांची प्रशंसा मिळविली. बुलढाण्याचे गझलकार विशाल मोहिते यांच्या आईला समर्पीत शेरने मैफिलीला भावनात्मक रंग चढविला.

***'जसा वागतो, तसा कुणीही बोलत नाही । जसा बोलतो तसा कुणीही वागत नाही ।। मी आईला सगळी दुःखे सांगत बसतो, आई मजला कधीच काही सांगत नाही ।।***

डॉ. राजेश उमाळेंनी बुलढाणेकर रसिकांच्या दर्दी उप-स्थितीला सलाम करीत शेवटची गझल 'या दिलदार मैफिलीला माझा सलाम आहे..' सादर करून मैफिलीची सांगता केली. शितल मांडवगडे यांचा मनाचा ठाव घेणारे तबला वादन, हरीश लांडगे यांच्या व्हायोलिनमधून निघालेली आर्तता, सागर काळे यांनी ऑर्गनमधून दिलेला भरीवपणा, शेवटपर्यंत न हललेली गर्दी, टाळ्यांचे क्षणाक्षणाला होणारे कडकडाट आणि ओळीओळीला मिळणारी दाद मित्रांगणद्वारे आयोजित गझल मैफिलीच्या यशस्वि-तेची साक्ष्य होती. मैफिलीच्या पूर्वीचे कार्यक्रमाचे सुसंगत आणि रंगतदार संचलन चंद्रशेखर जोशी यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. आशिष खासबागे तर आभार प्रदर्शन अभिजीत निंबाळकर यांनी केले. अतिथींचे स्वागत आनंद संचेती, डॉ. राजेश्वर उबरहंडे, कमलेश कोठारी, मनोज बुरड, रणजीतसिंग राजपूत, विक्की चव्हाण, रितेश खडके जैन, सुनिता प्रकाश जोशी यांनी केले.

गुड इव्हिनिंग City | बातम्या तसेच जाहीरातीसाठी संपर्क | प्रकाशक : रणजीतसिंग राजपूत ९८५०३७७३४४ | संपादक : ॲड. हरीदास उंबरकर ९७६३४६९१८४ // गुड इव्हिनिंग सिटी सोशल मिडीयावर सुद्धा... | किंमत १ रू.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सोयाबीन, तूर कुटाराच्या व्यावसायिक वापरावर बंदी!

## चाऱ्याची उपलब्धता कायम राखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश; उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

**बुलढाणा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्ह्यातील सर्व १३ तालुक्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम राखण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. खरिपातील सोयाबीन आणि तूर पिकांच्या काढणीनंतर उपलब्ध होणाऱ्या कुटाराचा औद्योगिक व व्यावसायिक वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. सोयाबीन व तुरीचे कुटार केवळ जनावरांचे खाद्य म्हणूनच वापरण्यात यावे, असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी जारी केले आहेत. या आदेशामुळे कुटाराचा वापर ब्रिकेट आणि पेलेट तयार करण्यासह अन्य बिगरकृषी कामांसाठी करता येणार नाही.

जिल्ह्यात यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत शेतातून मिळणाऱ्या पिकांच्या अवशेषांचा वापर जनावरांच्या खाद्यासाठी होणे आवश्यक आहे. मात्र, सोयाबीन व तूर काढणीनंतर मिळणारे कुटार काही खासगी उद्योगांकडून ब्रिकेट आणि पेलेट तयार करण्यासाठी वापरले जात असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. कुटाराचा अशा प्रकारे औद्योगिक वापर वाढल्यास भविष्यात पशुखाद्याची उपलब्धता कमी होऊन चाऱ्याची टंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाव्य संकटाचा विचार करून जिल्हा



प्रशासनाने कुटाराच्या वापराबाबत निर्बंध लागू केले आहेत.

महाराष्ट्र शासन आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यातील सर्व १३ तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-१' अर्थात प्रथम कळ दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील महसुली हद्दीत या आदेशाची अंमलबजावणी होणार आहे. दुष्काळाच्या काळात पशुधनाचे संगोपन करताना चाऱ्याची उपलब्धता हा महत्त्वाचा प्रश्न ठरतो. पावसाचे प्रमाण कमी राहणे, पिकांच्या उत्पादनावर होणारा परिणाम आणि चाऱ्याच्या मागणीत होणारी संभाव्य वाढ लक्षात घेता, उपलब्ध कृषी अवशेषांचा वापर नियोजनपूर्वक होणे आवश्यक आहे. सोयाबीन आणि तुरीच्या कुटाराला पशुखाद्य म्हणून महत्त्व असल्याने त्याचा औद्योगिक वापर रोखणे गरजेचे असल्याची भूमिका प्रशासनाने घेतली आहे. या निर्णयामुळे कुटाराचा वापर प्राधान्याने पशुधनासाठी होण्यास मदत होणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, व्यापारी अथवा संस्थांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम २२३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे कुटाराची खरेदी-विक्री, साठवणूक आणि वापर करताना संबंधितांनी आदेशातील निर्बंधांचे पालन करणे आवश्यक आहे.

### कुटाराचा साठा करण्यावरही निर्बंध

नवीन आदेशानुसार, सोयाबीन व तूर पिकांचे कुटार केवळ जनावरांचे खाद्य म्हणून वापरता येईल. त्याचा इतर कोणत्याही बिगरकृषी, औद्योगिक अथवा व्यावसायिक कारणासाठी वापर करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे जनावरे नाहीत, अशा व्यक्ती, व्यापारी आणि संस्थांना या कुटाराचा साठा करून ठेवण्यासही प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामुळे कुटाराची अनावश्यक साठेबाजी रोखण्यासोबतच उपलब्ध चारा पशुपालकांना मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे.

# सोयाबीनच्या उत्पादनात घट; कर्जाच्या विवंचनेत शेतकऱ्याची आत्महत्या



**लोणार, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** यंदाच्या हंगामात सोयाबीनच्या उत्पादनात झालेली मोठी घट, शेतीसाठी केलेला खर्च आणि डोक्यावरील कर्जाची चिंता यामुळे खचलेल्या गुंजखेड येथील एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना रविवारी, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी उघडकीस आली. दगडू नथु अंभोरे असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, त्यांच्या मृत्यूमुळे गुंजखेड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेने पुन्हा एकदा शेतीतील अनिश्चितता आणि शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकटाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दगडू अंभोरे यांनी शनिवारी, २४ ऑक्टोबर रोजी आपल्या शेतातील सोयाबीनची काढणी केली होती. दरवर्षी ज्या शेतातून साधारणतः १० ते १५ पोती सोयाबीनचे उत्पादन मिळत होते, त्याच शेतात यंदा अवघ्या दोन पोत्यांचे उत्पादन हाती आले. अपेक्षित उत्पन्नाच्या तुलनेत झालेली ही मोठी घट त्यांच्या चिंतेत भर घालणारी ठरली. पेरणीपासून काढणीपर्यंत केलेला खर्च, शेतीसाठी घेतलेले कर्ज आणि त्याची परतफेड कशी करायची, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला होता. शेतीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि आर्थिक व्यवहार अवलंबून असताना, उत्पादनात झालेल्या या घसरणीमुळे अंभोरे यांच्यावरील आर्थिक ताण वाढला होता. त्यातच कर्जाची परतफेड आणि पुढील आर्थिक नियोजनाची चिंता त्यांना सतावत होती, अशी माहिती समोर आली आहे. या परिस्थितीतून मार्ग काढण्याच्या विवंचनेत असलेल्या अंभोरे यांनी रविवारी सकाळी आपल्या शेतात आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच परिसरात शोककळा पसरली. अंभोरे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली आणि नातवंडे असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार असलेल्या कर्त्या व्यक्तीच्या निधनामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी वर्गातूनही चिंता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# 'भारत'चे मिहीर व पीयूष महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात

## भारत विद्यालयाची राष्ट्रीय क्रिकेट खेळाडू संख्या ५२ वर

**बुलढाणा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** महाराष्ट्र राज्य क्रीडा संचालनालय द्वारा आयोजित १९ वर्षाखालील राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा रत्नागिरी येथे पार पडल्या. त्यानंतर महाराष्ट्र संघ निवड चाचणी झाली. या मध्ये भारत विद्यालय बुलढाणा चे अष्टपैलू खेळाडू मिहीर माळी व पीयूष नरवाडे यांची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली.

या निवडी मुळे भारत विद्यालय क्रिकेट अकादमीचे ५२ राष्ट्रीय खेळाडू झाले आहेत. मिहीर व पीयूष यांचे या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्ष डॉ.सीमा आगाशे, सचिव अंगद आगाशे, प्राचार्य प्रल्हाद गायकवाड, उप प्राचार्य मोहन घोंगटे, पर्यवेक्षक नवल गवई, दिनेश गर्गे, अमोल बाळ, प्रशिक्षक संजय देवल, अरुण सौभागे, रोहन शेटे,सावरमल शर्मा, संदेश पाटील, आदित्य देवल तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी आमरे मॅडम, राज्य क्रीडा मार्गदर्शक जीवन मोहोड, मनोज श्रीवास, जिल्हा क्रिकेट संघटनेचे चंद्रकात साळुंखे, श्रीकृष्ण शेटे, राजेश भोसले, राजेश ढाले यांनी कौतूक केले.





# मोताळ्यात 'नेबरहुड युथ पार्लमेंट' उत्साहात; व्यसनमुक्तीची शपथला उत्स्फूर्त प्रतिसाद



**मोताळा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** युवकांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव आणि व्यसनमुक्तीविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'नेबरहुड युथ पार्लमेंट २०२६-२७' हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, माय भारत बुलढाणा आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात 'नशामुक्त युवा' ही संकल्पना केंद्रस्थानी होती. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा संकल्प केला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला जिल्हा युवा अधिकारी दिशा पोमन यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पुरुषोत्तम चाटे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अविनाश मेहेरकर, डॉ. सुनील मामलकर आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुप्रिया बेहेरे यांचीही उपस्थिती होती.

डॉ. पुरुषोत्तम चाटे यांनी व्यसनाधीनतेचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम विशद केले. निरोगी आणि सक्षम समाजाच्या उभारणीसाठी युवकांनी व्यसनांपासून दूर राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा युवा अधिकारी दिशा पोमन यांनी माय भारतच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देत युवकांनी त्यात सक्रिय सहभाग नोंदवावा आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांनी नशामुक्त भारताच्या निर्मितीत युवा पिढीची भूमिका निर्णायक असल्याचे अधोरेखित केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीविषयक घोषवाक्ये तयार करण्याचे आवाहन करण्यात आले.




**आई :** बेटा तू केस का कापत नाहीस?
**मुलगा :** फॅशन आहे आई.
**आई :** गाढवा तुझ्या ताईला पाहून गेलेल्या पाहुण्यांचा निरोप आलाय, लहान मुलगी पसंत आहे म्हणून.
आता जा नांदायला!

--------------------

समोरच्या अपार्टमेंटमधील एक बाई
पाच मिनिटं हात हलवत होती,
हे पाहून मग गण्याने पण हात केला
तेवढ्यात बायकोने गण्याच्या पाठीत रट्टा दिला
व म्हणाली, ती खिडकीची काच पुसतेय
दिवाळीच्या साफसफाईला शुभेच्छा

--------------------

**बंडया :** बाबा, एक ग्लास पाणी आणून द्या ना!
**बाबा :** बंडया, तिथे येऊन थोबाडीत मारीन तुझ्या..
**बंडया :** चालेल, पण येताना एक ग्लास पाणी पण आणा!!

--------------------

बायको 'रईस' चित्रपट बघायला जाऊयात का?
नवरा मी तेवढा 'काबिल' नाही.
बायको मग 'काबिल' बघायला जाऊयात.
नवरा मी तेवढा 'रईस' नाही.
नंतर त्यांच्या मुलांनी घरात 'दंगल' पाहिला

--------------------

गणिताची सूत्रे पाठ करण्यासाठी उखाणा उपक्रम..
महादेवाच्या पिंडीसमोर उभा आहे नंदी,
महादेवाच्या पिंडीसमोर उभा आहे नंदी,
आयताचे क्षेत्रफळ = लांबी गुणिले रुंदी

--------------------

**सोन्यासारखा नवरा**
नवरे हे सोन्यासारखेच असतात,
उगाच नाही , बायका त्यांना सारखं सारखं लुटत

--------------------

दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशीऑफिसला जाताना सुरेश काहीसा त्रासलेला दिसत होताम्हणून रमेश त्याला विचारतो
रमेश काय झाले रे? असा का तोंड वाकडे करून बसला आहेस
सुरेश मोबइलमध्ये एवढे सोने झाले आहे की अस वाटतंय,
संध्याकाळ पर्यंत एऊची धाड पडते की कायफ

--------------------

**अपमान आणि अभिमान**
**सुरेश :** एखाद्या गोष्टीचा अपमान वाटणे आणि नंतर तिचाच अभिमान वाटणे हे काळ सापेक्ष आहे.
**रमेश :** कसे?
**सुरेश :** लहान असताना पायाचे अंगठे पकडणं हा अपमान असतो.
**रमेश :** अभिमान कसा?
**सुरेश :** चाळीशी नंतर (हे जमल्यास) याचा अभिमान वाटू लागतो

--------------------

**वयानुसार डोस**
**डॉक्टर :-** तुमचं वय काय?
**महिला रुग्ण :-** २८ वर्षे.
**डॉक्टर :-** त्याचं काय आहे की,
मला तुम्हाला बेशुद्ध करण्यासाठी तुमच्या वयानुसार डोस द्यावा लागणार आहे म्हणून विचारतो.
**रुग्ण:-** ओ. अस्संय होय.. मग मी ३२ वर्षांची आहे.!
**डॉक्टर :-** बघा हा.! औषधाची मात्रा वयानुसार दिली गेली नाही तर कदाचित हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.
**रुग्ण:-** अरे बापरे.! मी ३८ वर्षांची आहे.

----------------------------



डोकं
सुरेश चावीने कान खाजनत उभा असतो
रमेश त्याला बघून
डोकं स्टार्ट होत नसेल तर धक्का देऊ का?

--------------------

**डोळे चहा डोळे**
**मुलगी :-** तुमचं नाव काय?
**बंड्या :-** बंड्या
**मुलगी :-** तुमचं शिक्षण किती झालं आहे?
**बंड्या :-** डोळे चहा डोळे
**मुलगी :-** हे असले कोणतं शिक्षण आहे
**बंड्या :-** मराठीत सांगितलेलं कळत नाही का? इंग्रजीत सांगू....आय टी आय

--------------

**या दोन्ही गोष्टींमधील फरक तुम्हाला नक्की माहित असेल**
वेडिंग आणि वेल्डिंग मधला फरक :
**वेल्डिंग :-** आधी ठिणग्या, नंतर जोड.
**वेडिंग (लग्न) :-** आधी जोड, नंतर ठिणग्याच, ठिणग्या !

--------------------

चोरांच भन्नाट उत्तर
**जज :-** घरामध्ये सगळे होते मग तू चोरी कशी केलीस ?
**चोर :-** जजसाहेब तुमची चांगली नोकरी आहे, पगार पण चांगला आहे
तुम्ही हे सगळं शिकून काय करणार ?

--------------------



शिक्षक आणि रिकामा डबा
गणिताचे शिक्षक स्टाफरूममध्ये रिकाम्या डब्यात चपाती बुडवून खात होते.
मराठीचे शिक्षक म्हणाले,सर, डब्यात तर काहीच नाही
गणिताचे शिक्षक म्हणाले, आम्ही भाजीला 'एक्स' मानलं आहे!

--------------------

**ज्योतिषी :** बाळा, तू खूप शिकणार आहेस.
बंडू हसू लागला. ज्योतिषाला काय झालं समजेना.
**ज्योतिषी :** बाळा, काय झालं हसायला?
**बंडू :** अहो, मी खूप शिकणार हे खरंय.
पण पास कधी होणार ते सांगा की..

गुड इव्हिनिंग City

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

## लग्नात साडी नेसताय? हेवी ब्लाऊज करा ट्राय

- हेवी स्लिव्हज : फुल स्लिव्हज किंवा थोडे लाँग स्लिव्हज शिवणार असाल तर त्यावर सुंदर वर्क करून घ्या. बारीक काम करून केलेले हे ब्लाऊज दिसायला खूपच सुंदर आणि हेवी दिसतात.
- वेलवेट ब्लाऊज : वेलवेट ब्लाऊज दिसायला एकदम रिच आणि कोणत्याही साडीचा लुक दुपटीने अधिक चांगला करणारा हा प्रकार तुमची साडी अगदीच साधी असेल तर वापरायला काहीच हरकत नाही.
- कटवर्क ब्लाऊज : कटवर्क साडी हा सध्या सगळ्यांच्याच आवडीचा असा प्रकार आहे. हल्ली कटवर्कमध्ये इतके प्रकार पाहायला मिळतात की, तुम्हाला पाहिल्यानंतरच हा ब्लाऊज जास्त आकर्षक दिसतो.

**लग्न म्हटले की, लग्नात नेमके काय नेसावे कधीच कळत नाही. लग्नसराईसाठी साड्या खूप वेगवेगळ्या प्रकारच्या मिळतात. पण तुम्हाला लग्नासाठी खूप पैसा खर्च करायची इच्छा नसेल पण लग्नात तरीही उठून दिसायचं असेल तर काही हॅक्स तुम्हाला नक्कीच कामी येतील.**

# लग्नासाठी रंग कोणता निवडू ?

**आताचा सगळा सीझन हा लग्नाचा आहे. त्यामुळे सगळीकडे खरेदीला चांगलाच जोर आला आहे. कपड्यांची, सोन्याची खरेदी मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. तुम्हीही या सीझनमध्ये लग्न करण्याचा विचार करत असाल तर रंगाचे काही खास ट्रेंड फॉलो करायला हवेत. आम्ही या सीझनचे असे काही रंग तुम्हाला सांगणार आहोत. जे तुम्ही नक्कीच तुमच्या लग्नाच्या सीझनमध्ये कुठेतरी वापरायला हवेत. चला जाणून घेऊया असे रंग...**

- लायलॅक (Lilac) : फिक्कट जांभळ्या रंगाची ही शेड सध्या चांगलीच चर्चेमध्ये आहे. डोळ्यांना सुखावणारा असा हा रंग खूप जणांच्या आवडीचा आहे. हा रंग लेहंगा आणि इंडो- वेस्टर्न आऊटफिटमध्ये अगदी सहज मिळू लागला आहे. या रंगाचा लेहंगा तुम्ही निवडला तर तुम्हाला त्यावर छान ज्वेलरी देखील निवडता येतात. मोती किंवा वेगवेगळ्या स्टोन्स ज्वेलरी या रंगावर फारच उठून दिसतात. तुमच्या जोडीदाराला त्यामुळे कोणताही लाईट रंग निवडण्याची मुभा मिळते.तुमचा जोडीदार पांढरा, मोती अशा शेड्समध्ये आरामात जाऊ शकतो. जर फिक्कट रंग तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही अगदी हमखास या रंगाची निवड करा.
- पीनट कलर (Peanut Colour) : पीनट अर्थात शेंगदाणा. तुम्ही टरफलातून शेंगदाणा काढून खाल्ला असेल तर त्याचे वेगवेगळे शेड तुम्हाला नक्कीच माहीत असेल. गुलाबी- चॉकलेटी याचा उत्तम समतोल साधलेला हा रंग दिसायला खूपच रिच आणि चांगला दिसतो. अगदी कोणत्याही स्किनटोनवर हा रंग उठून दिसणार नाही असे मुळीच होणार नाही. त्यामुळे हा रंगही सध्या चांगलाच ट्रेंडमध्ये आहे. त्यामुळे जर तुम्हाला तुमच्या लेहंग्याचा रंग हा घ्यायचा असेल तर तुम्ही हा रंग निवडू शकता. याला थोडा बोल्ड लुक द्यायचा असेल तर तुम्ही त्यावर हेव्ही वर्क घेऊ शकता.



- वाईन रंग (Wine Color) : वाईन रंग हा फॅशनच्या बाहेर कधीच जाऊ शकत नाही. विशेषतः काही ब्राईड्सना गडद रंग घालायला आवडतात. त्यांच्यासाठी हा रंग तर एकदम खासच आहे. जर तुम्हाला गडद रंग आवडत



असेल तुम्हाला वाईन शेड घ्यायला काहीच हरकत नाही. या रंगावर तुम्हाला मोती आणि काही इमिटेशन ज्वेलरी वापरता येतात. असा लेहंगा घातल्यानंतर तुम्हाला आजूबाजूचे डेकोरेशन हे थोडे लाईट रंगाचे निवडावे लागते. त्यामुळे तुम्ही हा रंग घेण्याचा विचार करत असाल तर लग्नासाठीचे डेकोरेशन कसे असावे याचा देखील विचार करा.
- हॉट पिंक (Hot Pink) : तुम्हाला गडद रंग निवडायचा असेल आणि तो ट्रेंडी हवा असे देखील वाटत असेल तर तुम्ही हॉट पिंक रंग निवडायलाही काहीच हरकत नाही. हा रंग खूपच चांगला उठून दिसतो. हॉट पिंक रंगावर तुम्हाला विरुद्ध म्हणजेच कॉन्ट्रास रंगाचे दुपट्टे किंवा ज्वेलरी निवडू शकता. या रंगाचा ब्लाऊज निवडताना ब्राईडल ब्लाऊजची निवड केली तर ते अधिक चांगे दिसतात. आता तुम्हाला जर काही खास रंग हवे असतील आणि तुमचा खास दिवस खूपच खास करायचा असेल तर या रंगाची निवड करू शकता.

# जाड नवरीला लेहंगा आवडतो?

**लग्नाच्या दिवशी प्रत्येक मुलीला अधिक सुंदर आणि आकर्षक दिसायचं असतं. लग्नामध्ये साडी कशी नेसायची याबाबत तर सर्वांना माहीत आहे. सहसा लग्नात वेगवेगळ्या प्रकारच्या साड्या नेसल्या जातात. पण प्लस साईज महिलांना मात्र लग्नामध्ये लेहंगा घालताना काही अडचणी येऊ शकतात. जेव्हा अशा महिलांना लग्नात लेहंगा घालायचा असतो तेव्हा त्यांना आपण अधिक आकर्षक दिसावे असे वाटत असते. लग्नामध्ये प्रत्येक मुलगी ही आकर्षकच दिसते आणि त्यासाठीच तिचा प्रयत्न असतो. आपण अधिक जाड आहोत म्हणून लेहंगा घालायचाच नाही असं अजिबात करू नका. लेहंगा घालूनही तुम्ही अधिक सुंदर दिसू शकता. प्लस साईज नवरीने लेहंगा निवडताना काही काळजी घ्यावी...**

- लेहंग्याचा रंग : कोणत्याही आऊटफिटचा आणि विशेषतः नवरी जे आऊटफिट घालणार असेल त्याचा रंग अत्यंत महत्वाचा असतो. बरेचदा आपल्याला अनेक रंग दिसायला आवडतात. पण काही रंग असे असतात जे आपल्याला आवडले तरीही ते आपण घातल्यावर आपल्यावर चांगले दिसत नाहीत. प्लस साईज नवरीसाठी लग्नात गडद रंगाचा लेहंगा अधिक चांगला दिसतो. गडद रंगाच्या लेहंग्यामध्ये अशा महिला अर्थात प्लस साईज महिला या अधिक बारीक दिसतात आणि तो रंग तुम्हाला अधिक आकर्षक दिसतो आणि उठावदार दिसतो.
- ब्लाऊजची नेकलाईन : आधुनिक लुकसाठी बऱ्याचदा अनेक महिला ऑफ शोल्डर (Off Shoulder) आणि हॉल्टर नेक स्लीव्ह्ज (Halter Neck Sleeves) घालण्याला प्राधान्य देतात. पण प्लस साईज महिलांना अशा स्वरूपाच्या नेकलाईनपासून वाचणं गरजेचे आहे. ब्लाऊजचा नेकलाईन डीप नेक ब्लाऊज, स्क्वेअर, व्ही शेप (V Shape Blouse) अशा स्वरूपाचे तुम्ही लेहंग्यासाठी वापरू शकता. लेहंग्यासाठी पारंपरिक स्वरूपाचा ब्लाऊज तुम्ही वापरणे जास्त चांगले ठरते. प्लस साईज महिलांनी या गोष्टीची काळजी घ्यायला हवी की, लहंगा आणि ब्लाऊज या दोन्हीमध्ये जास्त अंतर असू नये. तसंच तुमची पाठ जास्त दिसू नये याचीही काळजी घ्या. जेणेकरून तुम्ही बारीक दिसाल.
- लेहंग्याची लांबी : प्लस साईज महिलांसाठी ब्रायडल लेहंग्याची लांबी ही जास्त असणे गरजेचे आहे. जेव्हा तुम्ही नवरी म्हणून लेहंगा घालणार असाल तेव्हा तुम्ही लग्नाआधी लेहंगा नक्की घालून बघायला हवा. तसंच तुम्ही या लेहंग्याची उंची जास्त ठेवावी. जेणेकरून तुमची जाडी लपली जाईल. तसंच तुम्ही जो लेहंगा घालणार आहात त्याखाली घालण्यात येणारे हिल्स दिसत नाही ना याचीही तुम्ही काळजी घ्या. तुमच्या पायातील हिल्स दिसणार नाहीत आणि ते लपले जातील इतकी लेहंग्याची लांबी असणे गरजेचे आहे.
- फिश शेप लेहंगा घालू नका : फिश शेप लेहंग्यामध्ये (Fish Shape Lehenga) तुमच्या शरीराचा आकार उठून दिसतो. पण बारीक असणाऱ्या मुलींनाच हा लेहंगा अधिक चांगला दिसतो. प्लस साईज महिलांना अजिबातच फिश



शेप लेहंगा चांगला दिसत नाही. कारण यामध्ये पार्श्वभाग (hips) अधिक मोठे दिसतात, तर अशा महिलांना लेहंग्याचा ब्लाऊज हा कोपऱ्यापर्यंत घातला तर अधिक उठावदार दिसतो. तसंच अशा महिला बारीक दिसायला मदत मिळते. नवरी म्हणून तुम्ही फोटोमध्ये अधिक बारीक दिसायला हवं असेल तर तुम्ही अशा पद्धतीने लेहंग्याची स्टाईल करा.

गुड इव्हिनिंग City

# निरामय



## वाढवा स्मरणशक्ती!

**स्मरणशक्ती वाढवण्यासाठी आहारापासून व्यायामापर्यंत अनेक गोष्टी उपयोगी पडतात. व्यायामानंतर लगेच डुलकी काढल्यानं स्मरणशक्तीसाठी वाढण्यास मदत होते, असं अनेक संशोधनांती सिद्ध झालं आहे. स्मरणशक्ती वाढवण्यासाठी काय केलं पाहिजे, याविषयी...**

- विचार करताना : आपले डोळे बंद असतात, तेव्हा लक्ष विचलित होण्याची शक्यता कमी असते. एका विद्यापीठाने केलेल्या संशोधनानुसार ज्या व्यक्ती डोळे बंद करून प्रश्नांची उत्तरं देतात ती अचूक असतात. त्यामुळे विचार करताना डोळे बंद करा. या सरावामुळे स्मरणशक्तीदेखील वाढते.
- स्वत:शी संवाद साधा : स्वत:शी बोलणं ही चांगली सवय आहे. लोक काय म्हणतील याचा विचार करू नका. याला प्रॉडक्शन इफेक्ट असं म्हणतात. ऐकणं आणि बोलणं या दोन कृती एकाच वेळी पार पडत असल्यामुळे स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते.
- रक्तदाब तपासा : उच्च रक्तदाब असलेल्या लोकांना स्मरणशक्ती आणि विचार करण्याच्या प्रक्रियेशी निगडित समस्या उद्भवण्याची शक्यता असू शकते. अलाबामा युनिव्हर्सिटीच्या एका अभ्यासानुसार असं समोर आलं आहे की, उच्च रक्तदाबामुळे मेंदूला रक्तप्रवाह कमी होतो. परिणामी, स्मरणशक्ती कमी होते.
- गाणी गुणगुणा : गाणं गाताना मेंदूचा उजवी बाजू वापरली जाते, त्यामुळे समस्येचं निराकरण करण्याची क्षमता वाढते. नवीन गाण्याचे शब्द लक्षात ठेवणं, कठीण असलं तरीही तो एक प्रकारचा व्यायाम आहे. त्या मेंदूला फायदा होतो.
- ध्यानधारणा करणं फायदेशीर : दिवसातील पंधरा ते तीस मिनिटं ध्यानधारणा आणि योग करणाऱ्या व्यक्तींची स्मरणशक्ती उत्तम असते, असं एका अभ्यासातून समोर आलं आहे. यामुळे दृष्टिकोनात बदल होऊन सकारात्मक विचार करण्यास प्रेरणा मिळते. त्यामुळे अनेक मानसोपचारतज्ज्ञही ध्यानधारणा करण्याचा सल्ला देतात.
- दैनंदिन कामांमध्ये करा बदल : काही ठरावीक दिवसानंतर दैनंदिन कामांमध्ये लहानसहान बदल करणं आवश्यक आहे. नेहमीपेक्षा वेगळ्या खुर्चीवर बसा, टीव्ही पाहताना जागा बदला किंवा दैनंदिन वापरातील वस्तूंची जागा बदला. असे काही बदल केल्यानं बराच फरक पडेल.
- पेन्सिलचा वापर : ऐकताना किंवा काही पाहताना कागदावर रेघोट्या ओढण्याची सवय अनेकांना असते. अशा लोकांचा स्मरणशक्ती चाचणीत ३० टक्के अधिक उत्तम निकाल दिसून आला आहे. तसंच लिहिण्यानेही मेंदूचा व्यायाम होतो. त्यामुळे जो मजकूर लिहून काढतो तो अधिक चांगल्याप्रकारे लक्षात राहतो, असा अनेकांचा अनुभव आहे. त्यामुळे शक्य असल्यास लिहा. अर्थात, कीबोर्ड ऐवजी हातानं कागदावर लिहा. यामुळे मनातील भावनांना वाट मोकळी करून देता येईल.
- झोप आणि आहार : नियमित सात ते आठ तासांची झोप घ्या. यानंतर आपल्या आहारामध्ये फळे, हिरव्या भाज्या आणि प्रोटीन इत्यादी पोषक घटकांचा समावेश होत आहे की नाही, याची काळजी घ्या. सकाळी उठल्यानंतर पौष्टिक अन्नपदार्थांचे सेवन करा. ओमेगा थ्री फॅटी ॲसिडचा समावेश असलेल्या पदार्थांचा डाएटमध्ये समावेश करा. सुकामेवा, अळशीच्या बिया इत्यादी. नियमित आठ ते नऊ ग्लास पाणी प्या.



## सडपातळ करणारे फूड कॉम्बिनेशन



**दहापैकी प्रत्येकी पाच माणसे तरी वजन वाढीच्या समस्येने त्रस्त असतात आणि या समस्येतून लवकरात लवकर बाहेर पडण्यासाठी ते विविध उपायसुद्धा वापरत असतात. तुम्हाला माहीत आहेच की वजनवाढीच्या समस्येला चुकीची आहारशैली कारणीभूत असते. सध्या पौष्टिक आहार सोडून चटपटीत आहार खाण्याकडे लोकांचा कल असतो आणि त्याचेच परिणाम वाढत्या वजनाने भोगावे लागतात. विविध उपाय वापरूनही तुमचे वजन कमी होत नसेल तर तुम्ही काट्याने काटा काढण्याचा उपाय अवलंबला पाहिजे. योग्य आहार घेऊन तुम्ही तुमचे वाढलेले वजन कमी करू शकता. चला जाणून घेऊया असे काही फूड कॉम्बिनेशन जे तुम्हाला तुमचे वाढलेले वजन कमी करायला मदत करतील.**

- बदाम आणि सोया मिल्क : यूरोपियन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनानुसार बदामामध्ये मोठ्या प्रमाणात जीवनसत्त्व ई आणि हेल्दी फॅट आढळते. दर दिवशी ४३ ग्रॅम भाजलेले पदार्थ खाल्ल्यास वाढलेलं वजन वेगाने घटते. सोया मिल्क मध्येही प्रोटीन, जीवनसत्त्व आणि खनिज घटक असतात. हे सर्व घटक वजन नियंत्रित ठेवण्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असतात. म्हणून तुम्ही सुद्धा आवर्जून बदाम आणि सोया मिल्कचे सेवन करा आणि काही दिवसांतच तुम्हाला फरक दिसून येईल.
- ग्रीन टी आणि मिंट : ग्रीन टीमध्ये कॅटेचीन नावाचे एक अँटीऑक्सिडेंट असते जे वजन वाढवणाऱ्या कोशिकांना नियंत्रित ठेवण्याचे काम करते. याशिवाय फॅट एनर्जीमध्ये रुपांतरीत करण्यासाठी लिव्हरची क्षमता वाढवते. डिनरनंतर एक कप ग्रीन टी पिणे फायद्याचे असते. एका संशोधनात हे दिसून आले आहे की पेपरमिंट हे गॅस्ट्रोइंटेस्टाइनल समस्यांवर रामबाण असून या समस्या कमी करते. ज्यामुळे आतडे अधिक प्रभावीपणे कार्य करतात आणि वजन वाढू लागत नाही.
- काबुली चणे आणि ऑलिव काबुली चणे : काबुली चणे आणि ऑलिव काबुली चण्यात पोषक तत्वे आणि शरीरात मिसळणारे फायबर घटक असतात. हे खाद्य वजन संतुलित राखण्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. यातून भूक कमी होणारे हार्मोन कोलेसिस्टोकिनिन रिलीज होतात. यामुळे सारखी सारखी भूक लागत नाही. काबुली चणे आरामात एक्स्ट्रा वर्जिन ऑलिव ऑईलमध्ये मिसळले जातात आणि सेरोटोनिनचा स्तर वाढवतात. यामुळे तुम्हाला जर वजन कमी करायचे असले तर हे कॉम्बीनेशन तुमच्यासाठी सर्वात उपयुक्त आहे.
- पालक आणि ॲव्होकाडो: पालकमध्ये कॅलरी आणि कार्बोहाइड्रेट आढळते. वजन कमी करण्यासाठी याचा खूप फायदा होतो. ॲव्होकाडोमध्ये फायबर आणि हेल्दी फॅट आढळून येते. जर तुम्ही याचे रोज सेवन केले तर तुमच्या शरीराचे वजन योग्य प्रमाणात नियंत्रित राहील. अनेक जाणकार सुद्धा पालक आणि ॲव्होकाडोच्या सेवनाचा यामुळेच सल्ला देतात. जगभरात सुद्धा ज्यांना वजन कमी करायचे आहे ते पालक आणि ॲव्होकाडोने तयार होणाऱ्या डिशेस खाण्यावर भर देतात. त्यामुळे तुम्ही सुद्धा नक्कीच हे पदार्थ ट्राय करायला हवेत.
- नाचणी आणि काश्मिरी मिरची पावडर : नाचणीमध्ये मोठ्या प्रमाणात ट्रिप्टोफॅन नावाचे अमिनो ॲसिड आढळते. याचे सेवन केल्याने जास्त भूक लागत नाही. वजन कमी करु इच्छिणाऱ्यांसाठी म्हणूनच नाचणी एक उत्तम पर्याय आहे. काश्मिरी मिरची पावडरमध्ये कैप्रीसिन नामक घटक असल्याने त्याच्या सेवनानेसुद्धा वजन नियंत्रणात राहते. आहारासोबत जर तुम्ही व्यायामावर व योगावर भर दिला तर तुम्हाला अधिक चांगले परिणाम दिसून येतील. वजन हे कधीच झटपट कमी होत नाही हे लक्षात ठेवा. ते कमी होण्यासाठी काही वेळ लागतो आणि तेवढा संयम तर तुमच्यात हवाच पण वजन कमी करण्यासाठी लागणारी मेहनत सुद्धा तुम्ही घ्यायला हवी. या सर्वांचा एकत्रित परिणाम झाल्यावरच तुम्ही वजन वाढीपासून सुटका मिळवू शकता.

## पहिल्या अन् दुसऱ्या बाळाच्या जन्मात किती अंतर असावं?

- **सहा महिन्यांत दुसरे गरोदरपण असेल तर... :** ज्या महिला तिशीनंतर आई व्हायचा निर्णय घेतात त्यांच्याकडून ही चूक होण्याची शक्यता अधिक असते. कारण वाढत्या वयामुळे त्यांना दुसऱ्या बाळाच्या जन्माचा निर्णय लगेच घ्यायचा असतो. चाळीशीनंतर त्याची प्रजननक्षमता कमी होणार असल्यामुळे त्या सहा महिन्यांच्या आत दुसऱ्या बाळंतपणासाठी तयार होतात. मात्र हा निर्णय कोणत्याही स्त्रीच्या आरोग्यासाठी मुळीच हिताचा नाही. बाळंतपणामध्ये स्त्रीच्या शरीराची खूप झीज झालेली असते. शरीरात लोहाचे प्रमाण कमी असते. अशा वेळी दुसऱ्या बाळाच्या पोषणासाठी शरीर मुळीच सज्ज नसते. असा निर्णय घेतल्यास बाळ प्रिमॅच्युअर डिलिव्हरी, गरोदरपणात बाळाचे वजन कमी असणे अशा अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.
- **दोन प्रेगन्सीमध्ये किती असावे अंतर... :** जर पहिल्या बाळाच्या जन्मानंतर तुम्हाला लगेच दुसऱ्या बाळाच्या जन्माचा निर्णय घ्यायचा असेल तर दोन प्रेगन्सीमध्ये काही ठराविक काळाचे अंतर असायला हवे. अशा वेळी तुम्ही अठरा ते तेविस महिने म्हणजेच दीड ते दोन वर्षांचे अंतर ठेवू शकता. कारण या काळात आईच्या शरीराची झालेली झीज पुन्हा भरून निघते आणि बाळ आणि आईसाठी दुसरे बाळंतपण सुखरूप ठरते. शिवाय जर तुमचं पहिलं मूल थोडं मोठं असेल तर तुम्ही तुमच्या दुसऱ्या बाळाचे गरोदरपण आणि त्याचे संगोपन योग्य पद्धतीने करू शकता. गरोदरपण आणि बाळंतपण हे खर्चिक निर्णय असल्यामुळे या दोन वर्षांत तुम्ही हे अतिरिक्त खर्च योग्य पद्धतीने नियोजित करू शकता.

गुड इव्हिनिंग City

२५ ऑक्टोबर २०२६, रविवार


# बुलढाण्यात बालिकेवर अत्याचार

## ६० वर्षीय नराधमावर पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

**बुलढाणा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** शहरातील एका आठ वर्षांच्या अल्पवयीन बालिकेवर अश्लील कृत्य करून तिला धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दिलेल्या तक्रारीवरून बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात एका ६० वर्षीय व्यक्तीविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार माहितीनुसार, २३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी सुमारे ७ वाजता ८ वर्षांची मुलगी शहरातील एका टपरीवर कुरकुरे आणण्यासाठी गेली होती. यावेळी आर–ोपी शेख मोहम्मद पीर मोहम्मद याने तिला चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून दुकानात बोलावले. त्यानंतर बालिकेवर अश्लील कृत्य करून तिला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला. तसेच, याबाबत कोणाला काही सांगशील तर तुला मारेल, अशी धमकी दिली. हा प्रकार २३ ऑक्टोबरच्या रात्री



एका व्हिडिओच्या माध्यमातून समोर आला. तक्रारदाराच्या भावाला मोबाईलवर एक व्हिडिओ प्राप्त झाला होता, ज्यामध्ये परिसरातील दुकानदार लहान मुलीसोबत अश्लील चाळे करताना दिसत होता. व्हिडिओतील मुलीचे कपडे पाहून तक्रारदाराला संशय आला. दुसऱ्या दिवशी सकाळी मुलीला विश्वासात घेऊन विच–ारपूस केली असता तिने घडलेला सर्व प्रकार पालकांना सांगितला. या प्रकरणी २४ ऑक्टोबर रोजी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. आरोपी शेख मोहम्मद पीर मोहम्मद यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता (BNS), कलम ७४, ७५, ३५१(२) पोक्सो कायदा, २०१२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुषमा पाटील यांच्याकडे सोपवण्यात आला असून बुलढाणा शहर पोलीस या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

# बुलढाणा बॉक्सिंग अकॅडमीची पार्थ पवारची सुवर्णभरारी

**बुलढाणा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धा २०२६–२७ मध्ये बुलढाणा बॉक्सिंग अकॅडमीच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक उंचावला. पार्थ शिवाजी पवार याने ७० ते ७५ किलो वजनगटात सुवर्णपदक पटकावून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड मिळवली. स्वराज शत्रुघ्न शिंदे याने ८० किलोवरील वजनगटात नागपूर विभागाच्या खेळाडूवर विजय मिळवत कांस्यपदकाची कमाई केली.




क्रीडा व युवक सेवा संचा–लनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या माध्यमातून आयोजित या स्पर्धेत पार्थने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. सलग तीन लढतींमध्ये विजय मिळवत त्याने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या यशामुळे त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. स्वराज–नेही कौशल्य, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कांस्यपदक मिळवले.

दोन्ही खेळाडू बुलढाणा जिल्हा अम्युचर बॉक्सिंग असोसिएशनअंतर्गत बुलढाणा बॉक्सिंग अकॅडमीमध्ये प्रशिक्षक मोहम्मद सुफियान यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करतात. त्यांच्या यशामागे सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाचा महत्त्वाचा वाटा आहे. या यशाबद्दल बुलढाणा जिल्हा अ म्युचर बॉक्सिंग असोसिएशनचे माननीय आमदार धीरज लिंगाडे, विशाल खंडारे, जयसिंगजी जयवार, गोपाल सिंग राजपूत, कैलास पवार, धुमाळ सर, हुंबाड सर, सीमा देशमुख, राठोड सर तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आमरे यांनी दोन्ही खेळाडूंचे कौतूक केले.

# रावणाचे दहन करून... सावळा–सुंदरखेड कचरा डेपो प्रश्न पेटला

## माळविहीरमध्ये कचऱ्याचा डोंगर नको.. जिजाऊंचे स्मारक उभारा



**बुलढाणा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** बुलढाणा शहराल–गतच्या माळविहीर ई–क्लास परिसरातील प्रस्तावित कचरा डेपो प्रकल्पाविरोधात नागरिकांचा संताप अनावर झाला असून, सुंदरखेड येथील जुनागाव परिसरातील हनुमान मंदिराजवळ कचरा डेपोरूपी रा–वणाचे प्रतीकात्मक दहन करून नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेविरोधात तीव्र निषेध नोंदविला आहे. सावळा–सुंदरखेड–माळविहीर परिसर कचरा डेपो विरोधी संघर्ष समितीच्या वतीने आयोजित या आंदोलनात सावळा, सुंदरखेड, माळविहीर, भादोला व पोखरी परिसरातील सर्व जाती–धर्मांतील महिला, पुरुष, युवक, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

या आंदोलनातून नागरिकांनी आपली प्रमुख मागणी स्पष्ट केली की, माळविहीर ई–क्लास परिसरातील प्रस्तावित कचरा डेपो प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्ह्याला राष्ट्रमाता जिजाऊंचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. या ऐतिहासिक वारशाचा सन्मान राखण्यासाठी संबंधित जागेवर राष्ट्रमाता जिजाऊंचे भव्य स्मारक, प्रेरणास्थळ, अभ्यासिका, ग्रंथालय, सांस्कृतिक केंद्र आणि सार्वजनिक उद्यान उभारण्यात यावे, अशी विशेष मागणी करण्यात आली. ज्या जिल्ह्याला राष्ट्रमाता जिजाऊंचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे, त्या जिल्ह्याची ओळख कचऱ्याच्या डोंगरांनी नव्हे, तर जिजाऊंच्या भव्य स्मारकाने झाली पाहिजे. आमच्या परिसराला कचरा डेपोचा कलंक नको, जिजाऊंच्या विचारांचा अभिमान हवा! अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या. बुलढाणा शहरालगतचा खामगाव रोड परिसर हा वाढत्या लोकवस्तीचा आणि भविष्यातील नागरी विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग आहे. या ठिकाणी शाळा, महाविद्यालये, आरोग्य सुविधा, क्रीडांगणे, उद्याने आणि इतर सार्वजनिक विकास प्रकल्प उभारण्याची आवश्यकता आहे. आमच्या मुलांच्या हातात पुस्तके हवीत, कचऱ्याचे ढीग नकोत. आम्हाला शाळा, महाविद्यालये आणि विकासाच्या सुविधा हव्या आहेत. आमच्या पुढील पिढ्यांच्या भविष्याशी तडजोड करणारा कचरा डेपो आम्हाला कोणत्याही परिस्थितीत मान्य नाही अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी मांडली. प्रस्तावित कचरा डेपो रद्द करण्यासाठी संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे चार वेळा शांततेच्या व लोकशाही मार्गाने निवेदने सादर करण्यात आली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून नागरिकांनी आपला विरोध नोंदविला. यापूर्वी प्रशासनाकडून सात दिवसांच्या आत संबंधित अहवाल मागवून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. मात्र अद्याप प्रकल्प रद्द करण्याबाबत कोणताही ठोस निर्णय नागरिकांना कळविण्यात आलेला नाही. चार वेळा निवेदने देऊनही आमच्या मागण्यांना केराची टोपली दाखवली जात आहे का? प्रशासनाने नागरिकांच्या संयमाची परीक्षा पाहू नये. आम्हाला केवळ आश्वासने नकोत, कचरा डेपो रद्द करण्याचा लेखी आदेश हवा! असा संतप्त सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. प्रस्तावित कचरा डेपोमुळे दुर्गंधी, वायुप्रदूषण, जलप्रदूषण, कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांची वर्दळ, अपघातांचा धोका आणि आरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण होण्याबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली. आम्हाला स्वच्छ हवा, सुरक्षित पाणी, निरोगी जीवन आणि आमच्या मुलांसाठी उज्ज्वल भविष्य हवे आहे. आमच्या गावांच्या नावासमोर कचरा डेपोचा कायमस्वरूपी कलंक आम्हाला मान्य नाही. अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली. या आंदोलनात सर्व जाती–धर्मांतील महिला, पुरुष, युवक, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन लढा दिला. दरम्यान, मागण्या मान्य न झाल्यास सामूहिक आत्मदहनाचा इशारा देण्यात आल्याचे आंदोलनादरम्यान सांगण्यात आले. हा इशारा अत्यंत गंभीर असल्याने प्रशासनाने तातडीने नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर निर्णय घ्यावा आणि कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या आंदोलनातून नागरिकांनी माळविहीर ई–क्लास परिसरातील प्रस्तावित कचरा डेपो प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करणे, त्या जागेवर राष्ट्रमाता जिजाऊंचे भव्य स्मारक उभारणे आणि परिसरात शैक्षणिक, आरोग्यविषयक व सार्वजनिक विकास प्रकल्प राबविण या प्रमुख मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. आम्हाला दुर्गंधी नको, विकास हवा. आम्हाला कचरा डेपो नको, राष्ट्रमाता जिजाऊंचे भव्य स्मारक हवे! असा ठाम निर्धार व्यक्त करत प्रस्तावित कचरा डेपो प्रकल्प कायमस्वरूपी रद्द होईपर्यंत लोकशाही व शांततामय मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याची भूमिका संघर्ष समितीने मांडली.


Vision Buldana Educational & Welfare Society's

LADDHAD COLLEGE OF PHARMACY

YELGAON, BULDANA, 443002(M.S.), INDIA
(Approved by PCI, DTE & GOV. Of Maharashtra)
(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)
Website: www.lcpbuldana.ac.in E-mail- lcpbuldana@gmail.com ,
Contact No.: - 7773993509, 8770739993

ADMISSION NOTIFICATION 2026-27

Applications are invited from the eligible candidates for admission to Diploma in Pharmacy first year in academic year 2026-27 to fill vacancies against CAP & Institute level.

| SR. NO | Activity | D. Pharm first year. Against CAP & Institute level. |
|---|---|---|
| 1 | Sale of admission forms & Submission of duly filled application forms along with copies of nec-essary documents | 25/10/2026 to 27/10/2026 upto 1 PM |
| 2 | Display of Provisional Merit List | 28/10/2026 upto 5 PM |
| 3 | Submission of Grievance if any | 29/10/2026 upto 1 PM |
| 4 | Display of final Merit List | 29/10/2026 upto 5 PM |
| 5 | Institute level counseling & spot admission as per final merit list against CAP. | 30/10/2026 |

- All admissions will be made as per guidelines of Director of Technical Education / Competent Authority, Government of Maharashtra for session 2026-27.
- Merit list of Bachelor of Pharmacy first year & M. Pharmacy (Pharmaceutics) First Year shall be displayed on college website & also on college notice boards.
- Details of fees structure & any changes in schedule given above by competent authority will be notified available on the college website www.lcpbuldana.ac.in

Chairman | Principal



ADMISSION NOTIFICATION 2026-27

DWARKA BAHUUDDESHIYA GRAMIN VIKAS FOUNDATION, BULDHANA

RAJARSHI SHAHU COLLEGE OF PHARMACY, BULDANA

Approved by PCI New Delhi, Govt. of Maharashtra Mumbai & Affiliated to S.G.B.A.U. Amravati & M.S.B.T.E. Mumbai.

M.PHARMACY FIRST YEAR
1.PHARMACEUTICS 2. PHARMACOLOGY 3. QUALITY ASSURANCE 4. REGULATORY AFFIARS
B.PHARMACY FIRST YEAR
D.PHARMACY FIRST YEAR

AGAINST CAP SEATS

Application are invited from the eligible candidates for admission to M.PHARMACY, B.PHARMACY & DIPLOMA IN PHARMACY FIRST YEAR in Academic Year 2026 - 27 to fill Against Cap Vacancies.

SCHEDULE ACTIVITIES

| S.N | ACTIVITY | SCHEDULE FOR B.PHARM & M.PHARM | SCHEDULE FOR DIPLOMA IN PHARMACY |
|---|---|---|---|
| 1 | Invitation Of Application Along With Necessary Documents | 25/10/2026 to 26/10/2026 (up to 11:00 AM) | 25/10/2026 to 26/10/2026 (up to 11:00 AM) |
| 2 | Display of Provisional Merit List | 26/10/2026 (02:00 PM) | 27/10/2026 (02:00 PM) |
| 3 | Submission of Grievance if any | 26/10/2026 (up to 04:00 PM) | 27/10/2026 (up to 04:00 PM) |
| 4 | Display of Final merit List | 26/10/2026 AT 05:30PM | 27/10/2026 AT 05:30PM |
| 5 | Reporting For admission | 27/10/2026 to 29/10/2026 (up to 05:00 PM) | 28/10/2026 to 30/10/2026 (up to 05:00 PM) |

Eligibility criterion is strictly as per the rules and regulations prescribed by MAHACET Cell, Govt. Of Maharashtra & D.T.E. Mumbai. The Students are required to see the college Notice Board and college website for further details.

Principal

For Details Contact

RAJARSHI SHAHU COLLGE OF PHARMACY,
MALVIHIR BOTHA ROAD, BULDANA.
Mob :- 7377357371, 8830082331, 9960864613, 8483086811, 9860080013
Website :- www.rscp.ac.in Email Id :- principalrscp@gmail.com

# दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलसंधारण, रोजगारनिर्मिती आणि पाणी नियोजनावर भर द्या

## मंत्री प्रतापराव जाधव यांचे प्रशासनाला निर्देश



**बुलढाणा, २४ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन, पिण्याच्या पाण्याला प्राधान्य, शेतीसाठी संरक्षित सिंचन आणि पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन करावे. तसेच, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करताना जलसंधारण व विकासकामांची सांगड घालावी. लोकसहभागातून धरणांतील गाळ काढून तो शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करून देण्यासह नद्यांचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पाणीटंचाई, उपलब्ध जलसाठा, शेतीसाठी पाण्याची गरज, रोजगारनिर्मिती आणि पशुधनासाठी चारा नियोजनाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, माजी आमदार संजय रायमुलकर, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. चव्हाण यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, महावितरणचे अधिकारी आणि विविध जलप्रकल्पांचे अधिकारी उपस्थित होते.

दुष्काळी परिस्थितीमुळे आगामी काळात ग्रामीण भागात रोजगाराची समस्या निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे प्रस्तावित करावीत. पांदण रस्ते, नदी खोलीकरण, चर खोदणे आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी समन्वयाने नियोजन करून प्रत्येक तालुक्याचा स्वतंत्र कृती आराखडा तयार करावा, अशा सूचना जाधव यांनी दिल्या.

रोजगार हमी योजनेतून स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध होण्यासोबतच गावांमध्ये कायमस्वरूपी उपयुक्त ठरणारी विकासकामे पूर्ण करता येतील. त्यामुळे रोजगारनिर्मिती आणि जलसंधारण या दोन्ही उद्दिष्टांची पूर्तता होईल, यादृष्टीने प्रशासनाने काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील धरणे व जलप्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठा तसेच मृतसाठा विचारात घेऊन पिण्याच्या पाण्याचे योग्य आरक्षण करावे. उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करून नागरिकांना पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध होईल, याची दक्षता घ्यावी. पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी आवश्यक आरक्षण केल्यानंतर शिल्लक पाण्यातून खरीप हंगामातील तूर पिकाला संरक्षित सिंचन देता येईल का, याची शक्यता तपासावी. यामुळे पिकांचे संभाव्य नुकसान कमी करण्यास मदत होईल, असे निर्देश त्यांनी दिले. प्रत्येक गावातील नागरिकांना आवश्यक पाणी उपलब्ध होण्यासाठी गावनिहाय पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. सार्वजनिक विहिरींची स्वच्छता करून त्यांची उपयुक्तता वाढवावी. गावातील उंच ठिकाणी पाण्याच्या टाक्या उपलब्ध करून सार्वजनिक वापरासाठी पाणीसाठ्याची व्यवस्था करण्याच्या शक्यता तपासाव्यात. जलजीवन मिशनअंतर्गत खोदण्यात आलेल्या विहिरींना तातडीने विद्युत जोडणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी सांगितले.

# दाताळ्यात नियम धाब्यावर; दोन डीजे चालकांवर गुन्हे

**मलकापूर, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्हाधिकाऱ्यांनी डीजे वाजविण्यास प्रतिबंध घातलेला असतानाही दाताळा येथे मोठ्या आवाजात डीजे वाजविल्याचे आढळून आल्याने मलकापूर ग्रामीण पोलिसांनी दोन डीजे चालकांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. २३ ऑक्टोबर रोजी रात्री घडलेल्या या दोन्ही घटनांमध्ये एका डीजेची ध्वनिपातळी ११४ डेसिबल, तर दुसऱ्या डीजेची ९८.०६ डेसिबल नोंदविण्यात आल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला न जुमानता ध्वनिक्षेपकाचा वापर केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांनी ९ ऑक्टोबर २०२६ रोजी आदेश जारी करून १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेपासून २६ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपर्यंत डीजे वाजविण्यास प्रतिबंध घातला होता. संबंधित डीजे चालकांना भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६८ अन्वये नोटीसही देण्यात आली होती. असे असतानाही नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे वाजविण्यात आल्याचा आरोप आहे. पहिली घटना दाताळा येथील बसस्थानक परिसरात घडली. नवयुवक दुर्गादेवी मंडळाच्या वतीने २३ ऑक्टोबर रोजी रात्री ८ ते १० वाजेदरम्यान सरस्वती डिजिटल बँडचा डीजे वाजविण्यात आला. यावेळी ध्वनिपातळी ९८.०६ डेसिबल नोंदविण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. याप्रकरणी सरस्वती डिजिटल बँडचे मालक चंद्रकांत अशोक चौधरी (वय ५२, रा. यावल, जि. जळगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी घटना दाताळा येथील ग्रामपंचायत चौकात घडली. छत्रपती शिवाजी दुर्गा मंडळाच्या वतीने रात्री ९ ते १० वाजेदरम्यान गुरुमाऊली डिजिटलचा डीजे वाजविण्यात आला. या वेळी ध्वनिपातळी ११४ डेसिबलपर्यंत नोंदविण्यात आल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणातील डीजे चालकाविरुद्धही मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोठ्या आवाजातील ध्वनिक्षेपकांमुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि लहान मुलांना शारीरिक तसेच मानसिक त्रास होऊ शकतो. तसेच मानवी आरोग्य आणि सुरक्षिततेला धोका निर्माण होण्याची शक्यता पोलिसांनी फिर्यादीत व्यक्त केली आहे. या दोन्ही प्रकरणांत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ (ब), २७० व २९३ तसेच महाराष्ट्र पोलिस कायद्यातील संबंधित तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास मलकापूर ग्रामीण पोलिस करीत आहेत.

# शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या सुड्या पेटवणे थांबवा; माणुसकी जपा

## सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर वाघमारे यांचे आवाहन

**बुलढाणा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्ह्यातील शेतकरी आधीच दुष्काळ आणि आसमानी संकटांचा सामना करत असताना, आता त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरणारे अत्यंत दुर्दैवी प्रकार समोर येत आहेत. मोठ्या कष्टाने पिकवलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या सुड्या जाणीवपूर्वक पेटवून देण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

गोतमारा, हातेडी आणि जळगाव जामोदनंतर आता चिखली तालुक्यातील रोहडा शिवारातही सोयाबीनची सुडी पेटवून दिल्याची घटना घडली असून, यामुळे शेतकरी वर्गात तीव्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. समाजसेवक प्रभाकर वाघमारे यांनी या प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त करत एक भावनिक आवाहन केले आहे. शेतकरी हा समाजाचा अन्नदाता आहे. वैयक्तिक वाद किंवा द्वेषापोटी कुणाच्या पिकांचे नुकसान करणे अतिशय गंभीर आहे. दुसऱ्याच्या कष्टांची राख करून कोणालाही आनंद मिळू शकत नाही. शेतकऱ्यांच्या घामाचा सन्मान करा, त्यांच्या कष्टांचे मोल जाणून घ्या आणि माणुसकी जपा असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांचे पीक जाळणारे प्रकार तातडीने थांबवण्याची मागणी केली आहे. अशा समाजकंटकांना वेळीच आळा घालण्यासाठी प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच, नागरिकांनी व युवकांनी सतर्क राहून शेतात अशा संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी असे आवाहन प्रभाकर वाघमारे यांनी केले आहे.

# डीजेमुक्त दिंडी सोहळ्याने वेधले मोताळावासीयांचे लक्ष!

## सर्वेश्वर दुर्गा महिला मंडळाचा स्तुत्य उपक्रम; टाळ-मृदंगाच्या गजरात देवीला निरोप

**मोताळा, २५ ऑक्टोबर (गुड इव्हिनिंग सिटी) :** पारंपरिक वेशभूषा, टाळ–मृदंगाचा निनाद आणि मुखी देवीच्या नामाचा गजर अशा भक्तिमय वातावरणात सर्वेश्वर नगर दुर्गा महिला मंडळाने काढलेल्या डीजेमुक्त व पर्यावरणपूरक विसर्जन मिरवणुकीने मोताळावासीयांचे लक्ष वेधून घेतले. ध्वनिप्रदूषणाला फाटा देत पारंपरिक दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून मंडळाने सामाजिक भान जपत शहरासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त सर्वेश्वर नगर येथे दुर्गादेवीची स्थापना करण्यात आली होती. दहा दिवसांच्या या उत्सवात महिला मंडळाच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये गरबा, विविध खेळ, लहान मुलांसाठी वेशभूषा स्पर्धा तसेच विविध अभिनय स्पर्धांचा समावेश होता. धार्मिक कार्यक्रमांतर्गत प्रवचन आणि कीर्तनाच्या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक पर्वणी मिळाली.



महाप्रसादानंतर शनिवारी भक्तिमय वातावरणात दुर्गादेवीच्या विसर्जनासाठी भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सर्वेश्वर नगर येथून निघालेल्या या दिंडीत बालगोपाल, महिला भजनी मंडळ, पुरुष टाळकरी मंडळी आणि नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. टाळ–मृदंगाच्या तालावर देवीचा जयघोष करीत, पावल्या आणि गरब्याच्या माध्यमातून ही दिंडी शहरातून मार्गक्रमण करीत होती. डीजेचा गोंगाट टाळून पारंपरिक वाद्यांच्या साथीने साजरा झालेला हा सोहळा विशेष आकर्षण ठरला. या दिंडी सोहळ्याला ह.भ.प. विठ्ठल महाराज, विजय महाराज खवले, गायनाचार्य मंगेश महाराज सरोदे, श्रीकांत महाराज मोरखडे आणि मृदंगाचार्य सुपेश महाराज भोजने यांची विशेष उपस्थिती लाभली. निपाणा येथील टाळकरी तसेच सर्वेश्वर नगरमधील महिला टाळकरी मंडळींनी आपल्या सहभागातून दिंडीची शोभा वाढविली. महिला टाळकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेला हा सोहळा नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरला.

ध्वनिप्रदूषण टाळून भक्ती, परंपरा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या सर्वेश्वर दुर्गा महिला मंडळाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. उत्सव साजरा करताना सामाजिक जबाबदारीचे भान जपता येते, हे या डीजेमुक्त दिंडी सोहळ्याने दाखवून दिले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अभिधम्म पिटकावरील विचार

## (अभिधम्म, बुद्धांचा मूळ धम्म आणि आधुनिक सामाजिक-नैतिक दृष्टिकोन )

भारतीय बौद्ध पुनरुज्जीवनाच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केवळ वैयक्तिक धार्मिक श्रद्धेच्या रूपात केला नाही, तर मानवी स्वातंत्र्य, समता, बंधुता, नैतिकता आणि सामाजिक न्याय यांच्याशी त्याचा संबंध जोडला. बाबासाहेबांचा बुद्धविचार समजून घेण्यासाठी त्यांचे The Buddha and His Dhamma हे पुस्तक अत्यंत महत्त्वाचे आहे. हे पुस्तक १९५६ मध्ये त्यांच्या निधनानंतर १९५७ मध्ये प्रकाशित झाले. पुढे महाराष्ट्र शासनाच्या Dr. Babasaheb mbedkar: Writings and Speeches मालिकेतही ते प्रकाशित झाले. २०११ मध्ये ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने त्याची critical edition प्रकाशित केली, ज्यात बौद्ध ग्रंथांशी संबंधित संदर्भ, टिपणे आणि बाबासाहेबांच्या मांडणीचे चिकित्सक परीक्षण समाविष्ट आहे. या लेखाचा विषय आहे, अभिधम्म पिटकाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका काय होती आणि त्यांच्या व्यापक बुद्ध–धम्मविचाराच्या संदर्भात अभिधम्माचे स्थान कसे समजावे?

**१. त्रिपिटक म्हणजे काय?**

बौद्ध साहित्याच्या थेरवाद परंपरेतील पाली कॅननची पारंपरिक विभागणी तीन पिटकांत केली जाते **१) विनय पिटक :** यामध्ये भिक्खू आणि भिक्खुणी संघाच्या शिस्तीचे नियम, संघजीवनाची व्यवस्था आणि संघाशी संबंधित आचारसंहिता आढळते.



**२) सुत्त पिटक :** यामध्ये बुद्धांचे विविध उपदेश, संवाद, प्रवचने तसेच काही प्रमुख शिष्यांच्या शिकवणींचा समावेश आहे.

**३) अभिधम्म पिटक :** अभिधम्म पिटक हा धम्मातील विविध संकल्पनांचे अधिक विश्लेषणात्मक, वर्गीकरणात्मक आणि तात्त्विक विवेचन करणारा भाग आहे. पाली अभिधम्म परंपरेत सात प्रमुख ग्रंथ मानले जातात धम्मसंगणी, विभंग, धातुकथा, पुग्गलपञ्ञत्ती, कथावत्थु, यमक, पट्ठान अभिधम्माचा अभ्यास करणाऱ्या परंपरेनुसार यात मानसिक आणि भौतिक घटक, चेतना, मानसिक गुणधर्म, कारणसंबंध आणि विविध धम्मघटक यांचे अत्यंत सूक्ष्म विश्लेषण केले जाते. अभिधम्माला विशेष किंवा उच्च धम्मशिक्षण म्हणून स्पष्ट करण्याची परंपरा आहे.

**२. 'अभिधम्म' या शब्दाचा अर्थ**

'अभिधम्म' या शब्दाचा अर्थ केवळ धम्मापेक्षा मोठा असा सरळ घेणे योग्य नाही. अभिधम्माच्या पारंपरिक स्पष्टीकरणात धम्माचे अधिक विशिष्ट, विश्लेषणात्मक आणि व्यवस्थित विवेचन असा अर्थ घेतला जातो.

सुत्तांमध्ये बुद्ध वेगवेगळ्या व्यक्तींच्या आकलनशक्ती आणि परिस्थितीनुसार व्यवहारातील भाषा वापरतात. अभिधम्म परंपरेत मात्र अनुभवातील घटकांचे सूक्ष्म वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यावर भर दिसतो.यामुळे अभिधम्म हा बौद्ध विचारपरंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचा विश्लेषणात्मक विकास मानला जातो.

**३. अभिधम्माची निर्मिती आणि ऐतिहासिक प्रश्न**

येथे एक महत्त्वाचा ऐतिहासिक मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे.बौद्ध परंपरेत अभिधम्माला बुद्धांच्या शिकवणीशी जोडले जाते. काही पारंपरिक कथांनुसार बुद्धांनी तावतिंस लोकात अभिधम्माची देशना केली आणि पुढे ती सारिपुत्तादि शिष्यांपर्यंत पोहोचली, अशी परंपरा आहे. भारत सरकारच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राच्या (IGNCA) स्रोतामध्येही ही थेरवाद परंपरेतील आख्यायिका नोंदवलेली आहे.परंतु आधुनिक बौद्ध अध्ययनात अभिधम्म साहित्याच्या निर्मितीचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा मानला जातो. प्रारंभीच्या बौद्ध संघांमध्ये बुद्धांच्या शिकवणीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि तात्त्विक विस्तार होत गेला आणि विविध बौद्ध शाळांनी आपापल्या अभिधर्म परंपरा विकसित केल्या. म्हणूनच अभिधम्मातील प्रत्येक शब्द बुद्धांनी अक्षरशः सांगितला असे म्हणणे आणि अभिधम्माचा बुद्धांच्या धम्माशी काहीही संबंध नाही असे म्हणणेही दोन्ही टोकाची मते आहेत. ऐतिहासिक अभ्यासात अभिधम्माच्या विकासाला बौद्ध विचारपरंपरेच्या दीर्घ उत्क्रांतीचा भाग म्हणून पाहणे अधिक योग्य ठरते.

...उत्तरार्ध (पुढील अंकात)

– **कुणाल पैठणकर**
प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते, युवा व्याख्याते तथा अभ्यासक बुलढाणा ८४८२९२८४५६, ९४२१४६२६१८

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड चिखली, प्रो.प्रा. मोहित विजय गाडेकर, ता.चिखली जि. बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAMAR/2012/46689